# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### कुडाळ (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यात अपंगाचे आर्थिक विकासाचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(१) ६८०३४ (२७-०१-२०१७). श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यात अपंगाचे आर्थिक विकासाचे प्रस्ताव पंचायत समितीमध्ये प्रलंबित असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) आसल्यास, सदर प्रलंबित प्रस्ताव पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१७) :**(१) कुडाळ पंचायत समिती स्तरावर अशी बाब नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जालना जिल्ह्यात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या विहिरीत झालेला गैरव्यवहार

**(२) ७२८१४ (२७-०१-२०१७). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यातील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सन २०१५-१६ मध्ये लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या विहिरीत अनेकांनी जुन्याच विहिरी नव्या दाखवून कोट्यवधीचा गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने गैरव्यवहार करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२७-०९-२०१७) :**(१) नाही.
मग्रारोहयो अंतर्गत सन २०१५-१६ मध्ये या जिल्हयातील एकाही तालुक्यामंध्ये नविन विहिरीला मंजुरी देण्यात आलेली नाही, त्यामुळे गैरव्यवहाराचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील ८ पाटबंधारे प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत**

**(३) ७३८३१ (१८-०४-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयातील अर्जुना, मुचकुंदी, जिडे, यलोंदेवाडी, चिंचवाडी तर सिंधुदुर्ग जिल्हयातील पोर्ले, तिलारी, दोडामार्ग हे ८ पाटबंधारे प्रकल्प गेल्या १५ वर्षापासून प्रलंबित असून विदर्भाचा अनुशेष भरून काढण्यासाठी कोकणातील या प्रकल्पांना पुरेसा निधी देण्यास दिरंगाई करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार सदर प्रकल्पांना निधी देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०८-२०१७) :**(१) कोंकणातील अर्जुना, मुचकुंदी, तिडे, यलोंदवाडी, चिंचवाडी, तिलारी, कोर्ले-सातंडी व विर्डी या रत्नागीरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील ८ बांधकामाधीन प्रकल्पांच्या कामांकरीता शासनाकडून नियमितपणे निधी उपलब्ध करण्यात येत असून निधीच्या उपलब्धतेनूसार प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) उपरोक्त प्रकल्पांपैकी तिलारी आंतरराज्य पाटबंधारे प्रकल्प व अर्जूना मध्यम पाटबंधारे प्रकल्प या प्रकल्पांना केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजने अंतर्गत (एआयबीपी) निधी उपलब्ध होत आहे. तसेच मुचकुंदी, तिडे, चिंचवाडी, विर्डी लघु पाटबंधारे प्रकल्पांना (NABARD) अंतर्गत अर्थसहाय्य प्राप्त झाले आहे. रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील उपरोक्त ८ बांधकामाधीन प्रकल्पांच्या कामांकरीता मा.राज्यपालांच्या निर्देशानुसार व शासनाच्या अर्थोपायाच्या स्थितीनुसार अर्थसंकल्पिय तरतूद करून त्यानुसार नियमित निधी उपलब्ध करण्यात येत आहे. निधी उपलब्धतेनुसार उपरोक्त ८ बांधकामाधीन प्रकल्पांची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पाठरचा धनगरवाडा मुलभूत सुविधांपासून वंचित असल्याबाबत

**(४) ७३८५८ (१४-०४-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुका हा १४१ गावे व २५० वाड्या-वस्त्यामध्ये विभागला असून शाहुवाडी तालुक्यातील येळवणजुगाई पैकी पाठरचा धनगरवाडा हा रस्ते, पाणी, वीज यासारख्या मुलभूत सुविधांपासून वंचित असल्यामुळे तेथील नागरिकांची गैरसोय होत आहे तसेच मुलांना शाळेसाठी ५ कि.मी पायी जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार धनगरवाडा येथे मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०९-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) शाहूवाडी तालुक्यामधील पाठरचा धनगरवाडा येथे कच्चा रस्ता असून प्राथमिक शाळा पटसंख्या कमी असल्याने बंद करण्यात आलेली आहे. सदर वाड्यापासून २.५ किमी अंतरावरील येळवणजुगाई या गावामध्ये शिक्षणाची सोय उपलब्ध आहे.सर्व कुटुंबांकडे वैयक्तिक शौचालय तसेच घरगुती वीज उपलब्ध आहे. पाण्यासाठी नळ पाणीपुरवठा योजनेच्या विहीरीचा वापर केला जातो.शासनाच्या इतर योजनांमधून सदर वाड्यातील मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी जिल्हा परिषद स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वरेवाडी, कुंभारवाडी (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) गावांतील रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(५) ७३८६१ (१४-०४-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्याच्या अतिउंच भागात वरेवाडी व कुंभारवाडी ही गावे वसली असून या गावांत रस्त्याच्या दोन्ही बाजूला झाडवेल व जंगल असून रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर गावातील लोकांना व विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी रोज ३ ते ४ कि.मी. पायी चालत जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्यांची शासनाने पहाणी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार वरेवाडी व कुंभारवाडी गावातील नागरिकांसाठी नवीन रस्ता तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०९-२०१७) :**(१) रस्त्याची दुरावस्था झाली आहे हे खरे आहे.
(२) या गावामध्ये राज्य परिवहन मंडळाची वाहतुक होत नसल्याने सदर गावातील लोकांना व विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी रोज ३ ते ४ कि.मी. पायी चालत जावे लागते हे खरे आहे.
(३) जिल्हा परिषदेमार्फत रस्त्याची पहाणी करण्यात आली आहे.
(४) प्रश्नांकित रस्ता हा रस्ते विकास योजना २००१-२०२१ नुसार केकतवाडी वरेवाडी कुंभारवाडी केळेवाडी गमेवाडी मांडलाईवाडी करपेवाडी आंबेवाडी जाधववाडी धनगरवाडी पांढरेपाणी हा रस्ता इतर जिल्हा मार्ग क्र.१३ असून याची एकूण लांबी ३५.०० कि.मी. आहे. त्यापैकी वरेवाडी व कुंभारवाडी ही २/२०० ते ४/२०० लांबीमध्ये येत असून सदर रस्ता खराब झाला आहे. या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी रु.८५.०० लक्ष इतक्या निधीची आवश्यकता आहे.

जिल्हा नियोजन समितीअंतर्गत ३०५४ व ५०५४ अंतर्गत उपलब्ध होणा-या निधीमधून हा रस्ता प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन असून अनुदान उपलब्धतेनुसार सदर रस्त्याचे काम हाती घेण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील लव्हाळा-निनाई परळे रस्त्याची झालेली दुरवस्था

**(६) ७३८६६ (१९-०४-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर-रत्नागिरी या राष्ट्रीय महामार्गावरील लव्हाळा (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) येथून निनाई परळे व उदगिरी हा डोंगराळ भागांना जोडणारा रस्ता असून या रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची पाहणी केली आहे काय व त्याचे निष्कर्ष काय आहेत,
(३) असल्यास, त्यानुसार सदर रस्ता दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०९-२०१७) :**(१) सदर रस्ता डोंगरमाथा व अतिपावसाच्या भागात येत असल्याने खराब झाला आहे हे खरे आहे, तथापि या रस्त्यावर वाहतुक वर्दळ सुरु आहे.
(२) रस्त्याची पहाणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली असून रस्ता दुरुस्त करणे आवश्यक आहे.
(३) लव्हाळा-निनाई परळे हा रस्ता इतर जिल्हा मार्ग क्र.१९४ असून त्याची एकूण लांबी १०.५०० कि.मी. इतकी आहे. परळे निनाई या गावासाठी पर्यायी मार्ग उपलब्ध आहे व लव्हाळा हे गाव राष्ट्रीय महामार्गावरच आहे.

जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून प्राथम्यक्रमा नुसार रस्त्याचे काम प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मिरज (जि.सांगली) तालुक्यातील दुधगांव येथील लाभार्थ्यांना इंदिरा आवास घरकूलांचे वाटप करण्याबाबत**

**(७) ७३८९९ (१४-०४-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरज (जि.सांगली) तालुक्यातील दुधगांव येथील सन २०१५-१६ मध्ये इंदिरा आवास घरकूलांचे ६ लाभार्थ्यांचे प्रस्ताव सर्व कागदपत्रांच्या पुर्ततेसह पंचायत समिती मिरजकडे पाठवून त्या घरकूलांना तांत्रिक आदेश ग्रामपंचायत कार्यालय व लाभार्थ्यांना मिळाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ६ लाभार्थ्यांना घरकुलांचे वाटप करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर लाभार्थ्यांना घरकुलाचे वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०९-२०१७) :**(१) होय.

(२) व (३) मिरज तालुक्यातील दुधगाव येथील ६ लाभार्थ्यांना सन २०१५-१६ मध्ये इंदिरा आवास योजनेतर्गत घरकुलासाठी प्रशासकीय मंजूरी देण्यात आली असून घरकुलाचा पहिला हप्तादेखील वितरीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे मेंढोली (जि. कोल्हापूर) येथील संरपच व ग्रामसेवक यांनी खोटे दाखले दिल्याबाबत**

**(८) ७४४४५ (१४-०४-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील केदारलिंग विकास सेवा संस्थेच्या पंचवार्षिक निवडणुकीत कार्यक्षेत्राबाहेरील ५५ सभासदांना मेंढोलीचे रहिवाशी असल्याचे खोटे दाखले मेंढोलीचे सरपंच व ग्रामसेवक यांनी दिल्याबाबत तेथील ग्रामस्थांनी मुख्यकार्यकारी अधिकारी, जि.प. कोल्हापूर यांच्याकडे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने सरपंच व ग्रामसेवक यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१७) :**(१) हे खरे आहे.

श्री. विलास मारुती जोशिलकर, रा. मेंढोली यांनी दि. २३/११/२०१६ अन्वये तक्रार अर्ज दिलेला आहे.

(२) याबाबत चौकशी करण्यात आली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर यांनी दि. १३/१२/२०१६ च्या पत्रान्वये गट विकास अधिकारी पंचायत समिती, आजरा यांना चौकशी करण्यास कळविले होते. याबाबतचा अहवाल गट विकास अधिकारी पंचायत समिती, आजरा यांच्याकडून प्राप्त झालेला आहे. त्यामध्ये सकृत दर्शनी ग्रामसेवक व सरपंच दोषी असल्याचे आढळून आले आहे.

(३) गट विकास अधिकारी पंचायत समिती आजरा यांच्या चौकशी अहवालानुसार सरपंच सौ वैशाली निवृत्ती शेंडे ग्रामपंचायत मेंढोली ता. आजरा यांना दि. ३१/०३/२०१७ अन्वये कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा मागणी करणेत आलेला होता. त्यानुसार खुलासा प्राप्त झाला असून सरपंच यांचेवर कारवाई करावी असे गट विकास अधिकारी पंचायत समिती आजरा यांनी कळविले आहे. तसेच ग्रामसेवक श्री. सम्राट लक्ष्मण देसाई यांना दि. १९/०५/२०१७ रोजी कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा मागण्यात आलेला आहे. त्यांचा खुलासा प्राप्त होताच कागदपत्रांची पडताळणी करून नियमानुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालेगाव (जि.नाशिक) तालुक्यात स्वच्छ भारत अभियान राबविण्यास दिरंगाई होत असल्याबाबत

**(९) ७४५६९ (१४-०४-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) तालुक्यात स्वच्छ भारत अभियान राबविण्यास पंचायत समितीचे अधिकारी दिरंगाई करीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर अभियान राबविण्यास दिरंगाई करणा-या अधिकारी व कर्मचा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०९-२०१७) :**(१) नाही.

एकूण १२४ पैकी ६३ ग्रामपंचायती हागणदारीमुक्त झाल्या असून वैयक्तिक शौचालयाचे उद्दिष्ट १४९४७ असून साध्य १९९४५ चे काम पूर्ण झालेले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे पालपेणे ते वाकी पूर्ववाडी (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथे योजनाबाहय रस्ता व मौजे वैजी ते मालघर पंप हाऊस (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथे योजनाबाहय रस्त्याला संरक्षण भिंत बांधणे या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(१०) ७४६०३ (१५-०४-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा नियोजन मंडळातील जिल्हा वार्षिक योजनेतून इतर जिल्हा रस्ते विकास व मजबुतीकरण कार्यक्रमांतर्गत योजनाबाहय रस्ता व रस्त्याला संरक्षण भिंत बांधणे या दोन्ही कामांसाठी निधी खर्च करता येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे पालपेणे ते वाकी पूर्ववाडी (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) या योजनाबाहय रस्त्यासाठी व मौजे वैजी ते मालघर पंप हाऊस (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) या ग्रामा १२२, ०/९०० ते १/०० यादरम्यान रस्त्याला संरक्षक भिंत बांधण्यासाठी जिल्हा नियोजन मंडळातील जिल्हा वार्षिक योजना सन २०१५-२०१६ अंतर्गत निधी खर्च करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार नियमबाह्य निधी खर्च करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०९-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. मौजे पालपेणे ते वाकी पूर्ववाडी असा रस्ता अस्तित्वात नाही. तसेच मौजे वैजी ते मालघर पंप हाऊस या ग्रामीण मार्ग क्र. १२२ या रस्त्याला संरक्षण भिंत बांधण्याचे काम कोणत्याही योजनेतून कोणत्याही यंत्रणेकडून करण्यात आलेले नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**साकोली (जि.भंडारा) तालुक्यात असलेल्या शिवनीबांध जलाशयास पर्यटन स्थळाचा दर्जा मिळणेबाबत**

**(११) ७४८२६ (१९-०४-२०१७). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साकोली (जि.भंडारा) तालुक्यात असलेल्या शिवनीबांध जलाशय परिसरात मत्स्य बीज उत्पादन केंद्र व रोपवाटीका पाहण्यासाठी पर्यटकांची नेहमी वर्दळ असते त्यामुळे येथील जलाशयात बोटींगची व्यवस्था झाली तर पर्यटकांची संख्या वाढून बेरोजगारांना काम मिळेल तसेच या शिवनीबांध जलाशयाला पर्यटनस्थळ घोषीत करावे अशी मागणी पर्यटक करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार शिवनीबांध जलाशयाला पर्यटनस्थळ घोषीत करण्याबाबत व पर्यटनासाठी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२४-०८-२०१७)** :(१) साकोली तालुक्यातील शिवनीबांध या पर्यटनस्थळास सन २०१३ मध्ये "क" वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा देण्यात आला आहे.
(२) व (३) भंडारा जिल्ह्यामध्ये पर्यटनाचा विकास करण्याकरिता जिल्हा पर्यटन बृहत विकास आराखडा तयार करण्यात आला असून शिवनीबांध, ता.साकोली या स्थळाचा पर्यटनदृष्ट्या विकास करण्याकरिता रू.२६०.३५ लक्षची विकास कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.

---

**राज्यातील ग्रामीण भागातील मुला-मुलींच्या वसतीगृहास ग्रामपंचायत कर माफ करणेबाबत**

**(१२) ७४९१४ (१९-०४-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण भागातील गरीब व गरजू मुले उच्च शिक्षणापासून वंचित राहू नयेत या हेतूने शिक्षण संस्था विदयार्थ्यांकडून नाममात्र शुल्क घेवून वसतिगृहे चालवितात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ अंतर्गत महाराष्ट्र कर व फी नियम १९६० चे कलम ७ मधील तरतुदीनुसार केवळ धार्मिक व शैक्षणिक कार्यासाठी वापरात आणल्या जाणाऱ्या इमारतींना करातून सूट देण्यात आली असताना सदर वसतिगृहांवर ग्रामपंचायतींकडून भरमसाठ कर वसूल केला जात असून वसतिगृहांवरील ग्रामपंचायत कर माफ करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०९-२०१७)** :(१), (२) व (३) महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० मधील नियम ७ (४) मधील तरतुदींनुसार केवळ धार्मिक, शैक्षणिक किंवा धर्मादाय प्रयोजनासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या जमिनी व इमारतीवर कर बसविण्यापासून सूट देण्यात आली आहे.

शैक्षणिक प्रयोजनासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या मालमत्तेमधील वर्ग खोल्या, ग्रंथालय, प्रयोगशाळा, कार्यालय, क्रिडांगण, प्रेक्षागृह यांनाच केवळ करात सूट देण्यात आली असून,

याव्यतिरिक्त वसतिगृह, कर्मचारी निवासस्थाने, उपाहारगृह, व्यावसायिक इ. कारणाकरिता वापरात असणाऱ्या भागास करातून सूट देण्यात आलेली नाही.

याबाबतची वस्तुस्थिती माननीय लोकप्रतिनिधीकडून प्राप्त दिनांक ०४/१०/२०१६ रोजीच्या पत्रास अनुसरुन दिनांक १५/०३/२०१७ रोजीच्या पत्रान्वये माननीय लोकप्रतिनिधी यांना कळविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**इगतपूरी (जि.नाशिक) तालुक्यातील वाकी खापरी धरणाच्या पुर्नवसित गावठाणातील कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत**

**(१३) ७४९२६ (१४-०४-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपूरी (जि.नाशिक) तालुक्यातील वाकी खापरी धरणाच्या पुर्नवसित गावठाणात रस्ते, वीज, पाणी, शौचालये यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर गावठाणातील गैरसोयी दूर करण्याबाबत व निकृष्ट दर्जाचे काम करणा-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०९-२०१७) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर येथील काळम्मावाडी थेट पाईपलाईसाठी जागा भाडेतत्वावर देण्याबाबत**

**(१४) ७५४२० (२०-०४-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील काळम्मावाडी थेट पाईपलाईन योजनेतील पाईपलाईनसाठी आवश्यक असणा-या जलसंपदा विभागाच्या ताब्यातील जमिनीचा प्रश्न अदयापी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर थेट पाईपलाईनसाठी विशेष बाब म्हणून शासनाने जागा भाडेतत्वावर द्यावी असा प्रस्ताव महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने जलसंपदा विभागाच्या प्रधान सचिवांना पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०८-०८-२०१७) :**(१) होय.

(२) व (३) होय.

कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या दि.२३.११.२०१६ रोजीच्या पत्रान्वये केंद्रशासनाच्या UIDSSMT कार्यक्रमांतर्गत कोल्हापूर शहर पाणी पुरवठा योजनेकरिता जलसंपदा खात्याच्या ताब्यातील जमीन कोल्हापूर महानगरपालिकेस भाडेतत्वावर देण्यास मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. त्यानुषंगाने शासनाने दि.१३.०१.२०१७ रोजीच्या पत्रान्वये महामंडळस्तरावर उचित कार्यवाही करावी अशा सूचना दिल्या होत्या.

त्यानुसार प्रस्तुत प्रकरणी महामंडळाच्या नियामक मंडळाच्या दि. १७.०३.२०१७ रोजी झालेल्या ९४ व्या बैठकीमध्ये कोल्हापूर महानगरपालिकेस शहराच्या पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईन कामासाठी आवश्यक असलेले २.३८४ हे. क्षेत्र भाडेतत्वावर हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्हयाला चौदाव्या वित्त आयोगाच्या जनरल बेसिक अनुदानांतर्गत दुस-या टप्प्यात मिळालेला निधीचा योग्य विनियोग करण्याबाबत

**(१५) ७५६६५ (१४-०४-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयाला चौदाव्या वित्त आयोगाच्या जनरल बेसिक अनुदानांतर्गत दुस-या टप्प्यात ६५ कोटी ९७ लाख ६३ हजार रुपयांचा निधी मिळाला असल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे संपूर्ण अनुदान जिल्हयातील ग्रामपंचायतींना लोकसंख्येच्या प्रमाणात वितरीत केले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निधीचे योग्य विनियोग करावा यासाठी ग्रामपंचायतींनी विकास कामांचे आराखडे तयार करुन त्याची अंमलबजावणी करावी यासाठी ग्रामपंचायतींना सूचित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०९-२०१७) :**(१) होय.

चौदाव्या केंद्रिय वित्त आयोगांतर्गत केंद्र शासनाकडून सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचा जनरल बेसिक ग्रँटचा दुसरा हप्त्याचा प्राप्त निधी दि. ०२/०१/२०१७ रोजी सर्व जिल्हा परिषदांकडे वितरित करण्यात आला असून त्यामध्ये पुणे जिल्हयाला रु. ६५ कोटी ९७ लाख ६३ हजार इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

(२) चौदाव्या केंद्रिय वित्त आयोगांतर्गत निधी वितरणाबाबत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन निधीचे वितरण जिल्ह्याची लोकसंख्या (९०%) व क्षेत्रफळ (१०%) याच्या आधारे करण्याबाबतचा निर्णय राज्य शासनाने घेतला असून त्या निकषाप्रमाणे पुणे जिल्ह्याकरीताचा निधी वितरणाची कार्यवाही ग्राम विकास विभागाकडून करण्यात आली आहे.
(३) चौदाव्या वित्त आयोगाच्या निर्देशनानुसार ग्राम पंचायत विकास आराखडा तयार करुन त्यानुसार ग्रामपंचायतींनी कामे व उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करावयाची आहे. त्यामध्ये चौदाव्या वित्त आयोगाच्या वितरीत निधीचा वापर ग्रामपंचायतींकडे सोपविण्यात आलेल्या पायाभूत सुविधा नियमितपणे व प्रभावीपणे देण्यासाठी करावयाचा असून ,तशा सूचना ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडून दि. ३१ ऑगस्ट, २०१६ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील अनेक रस्ते वाहून गेल्याबाबत

**(१६) ७६४६७ (१९-०४-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यात दरवर्षी पावसाचे प्रमाण अधिक असते परंतु यावर्षी पावसामुळे अनेक रस्ते वाहुन गेले आहेत व अनेक रस्ते व गावातील अंतर्गत रस्ते खड्डेमय व खराब झाल्यामुळे नागरीकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्यांची पहाणी केली आहे काय व त्यानुसार शाहुवाडी तालुक्यातील रस्ते तातडीने दुरुस्त करण्याबाबत शासनान कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०९-२०१७)** :(१) शाहुवाडी तालुक्यामध्ये अधिक पावसामुळे काही प्रमाणात रस्त्यांचा पृष्ठभाग खराब झाला आहे. परंतु कोणताही रस्ता वाहुन गेलेला नाही.
(२) रस्त्यांची पहाणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली असून अतिवृष्टीमुळे नादुरुस्त झालेल्या इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग रस्त्यांवरील वाहतूक सुरळीत सुरु राहणे आवश्यक असल्याने ३०५४ रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत अशा रस्त्यांची कामे प्राधान्याने शासन स्तरावर सादर करण्याबाबत तसेच जिल्हा नियोजन समितीकडे निधीची मागणी करण्याबाबत या विभागाकडील दिनांक २५ नोव्हेंबर, २०१६ च्या पत्रान्वये जिल्हा परिषदांना सूचना देण्यात आल्या आहेत.
त्याप्रमाणे जिल्हा परिषदेने शाहुवाडी तालुक्यातील खराब रस्ते दुरुस्तीसाठी रु.२७५९.०० लक्ष इतक्या निधीची मागणी जिल्हा नियोजन समितीकडे केली आहे.
निधीच्या उपलब्धतेनुसार कामे हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कल्याण तालुका पंचायत (जि.ठाणे) समितीची नवीन इमारत बांधण्याबाबत**

**(१७) ७६८२५ (१९-०४-२०१७). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण तालुका पंचायत (जि.ठाणे) समितीची इमारत धोकादायक झालेली असून माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान काही भाग कोसळला असून नवीन इमारत बांधकामाचा प्रस्ताव मान्यतेसाठी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, तदनुसार कल्याण पंचायत समितीच्या नवीन इमारत बांधकामाच्या प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०९-२०१७) :**(१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) सर्व कर्मचाऱ्यांना इमारतीच्या सुरक्षित जागेत स्थलांतरीत करण्यात आले आहे. तसेच, वापरातील इमारतीची आवश्यकतेनुसार डागडूजी करण्यात आली आहे.

जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावात आढळून आलेल्या त्रुटींची पुर्तता करून परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत जिल्हा परिषदेला कळविण्यात आले आहे. कल्याण पंचायत समिती नवीन इमारत बांधण्यासाठी आवश्यक असलेल्या जादा FSI ची मागणी करण्याचा प्रस्ताव जिल्हा परिषदेकडून नगर विकास विभाग मंत्रालय यांच्याकडे दि. ६.०१.२०१७ रोजी सादर केला आहे. नगर विकास विभाग मंत्रालय यांनी दिनांक ०७.०२.२०१७ च्या पत्रानुसार आयुक्त कल्याण डोंबिवली महानगरपालिका व सहायक संचालक नगर रचना, ठाणे यांच्याकडून या प्रकरणी अभिप्राय मागितले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे देवगाव सावरखेडा (ता.पारोळा, जि.जळगांव) येथील रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(१८) ७६८५९ (१२-०४-२०१७). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे देवगाव सारखेडा (ता.पारोळा, जि.जळगांव) येथील रस्त्याची दुरवस्था झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पहाणी केली आहे काय,

(३) असल्यास, पहाणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नूसार सदर रस्त्याची तातडीने दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०९-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) जिल्हा परिषदेमार्फत पहाणी करण्यात आली आहे.
(३) रस्ते विकास योजना २००१-२०२१ अंतर्गत सावरखेडा ते देवगांव ता.पारोळा हा ग्रामीण मार्ग क्र.१४४ असून त्याची एकूण लांबी ४.५० कि.मी. आहे. मात्र त्याची प्रत्यक्षात लांबी ४.९० कि.मी. इतकी आहे.

या लांबीपैकी ०/० ते १/२५० व २/८०० ते ४/९०० कि.मी. लांबी खडीपृष्ठभागाची असून १/२५० ते २/८०० कि.मी. लांबी मुरुमी स्वरुपाची आहे. सदर रस्त्यासाठी सन २०१६-१७ मध्ये "ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण" या जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत या रस्त्याचे रु.२.९९ लक्षचे काम करण्यात आले आहे. उर्वरीत लांबीतील खडीकरण,डांबरीकरण व दोन मो-या बांधणे या कामासाठी रु.४०.०० लक्ष निधीची आवश्यकता आहे. सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात "ग्रामीण रस्ते विकास व मजबूतीकरण "या जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सदरचे काम प्रस्तावित केलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वरुडी पठार (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) गावातून जवळा बाळेश्वर गावाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(१९) ७६९५१ (१४-०४-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हा परिषदेच्या निधीतून बोटा गटातील वरुडी पठार (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) गावातून जवळा बाळेश्वर गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर ठेकेदारांनी जुन्याच कामावर खडी व वरुन डांबर टाकून डांबरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे केल्यामुळे ग्रामस्थांनी संबंधित रस्त्याचे काम बंद केल्याची माहिती दिनांक २६ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या संबंधित ठेकेदार व अधिकारी यांचेविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०९-२०१७) :**(१) प्रश्नांकित रस्ता हा काम करण्यापूर्वी डांबरी पृष्ठभागाचा होता. परंतु डांबरी पृष्ठभाग अत्यंत खराब झाल्यामुळे ३०५४ रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत मजबुतीकरण व डांबरीकरण असे काम मंजूर करण्यात आलेले होते. त्याप्रमाणे काम करण्यात आलेले आहे.

राज्य गुणवत्ता निरिक्षक यांनी कामाची पाहणी करुन काम उत्तम झाल्याबाबत अभिप्राय दिलेले आहेत.

तसेच सदरचे काम चालू असताना ग्रामस्थांनी काम बंद केलेले नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळमनुरी (जि.हिंगोली) येथील पंचायत समितीच्या इमारतीच्या बांधकामास निधी मिळण्याबाबत**

**(२०) ७७२४४ (१४-०४-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (जि.हिंगोली) येथील पंचायत समिती प्रशासकीय इमारत बांधकामास निधी उपलब्ध करुन प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.ग्रामविकास मंत्री यांना दिनांक १२ ऑगस्ट, २०१६ रोजी लेखी निवेदन देण्यात येऊनही अदयापी याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०९-२०१७) :**(१) व (२) या प्रकरणी लोकप्रतिनिधींचे निवेदन प्राप्त झाले आहे.

कळमनुरी पंचायत समिती प्रशासकीय इमारत बांधकामाचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. प्रशासकीय इमारतींच्या चालू बांधकामांना निधी देण्याचे दायित्व व चालू वर्षातील अर्थसंकल्पीय तरतूद विचारात घेवून राज्यातील नवीन पंचायत समिती बांधकामाबाबत मागणीचा प्राधान्यक्रम ठरवून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पर्यटन विभागाने सिंहस्थ कुंभमेळ्यात मंजूर केलेले उपक्रम अपूर्ण असल्याबाबत**

**(२१) ७७४९७ (१५-०४-२०१७). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गतवर्षी नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभ मेळ्यात देश-विदेश्यातील भाविक व पर्यटक येण्याची शक्यता लक्ष्यात घेऊन पर्यटन विकास विभागाने नाशिक मध्ये बोटिंग क्लब, कलाग्राम, स्पोर्ट्स क्लब, धरणाकाठी वसलेले गाव यासह अन्य काही उपक्रमांची आखणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,यापैकी काही उपक्रमांचे उद्घाटन होवूनही पर्यटकांना त्याचा लाभ मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदर प्रकल्प तात्काळ पुर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२४-०८-२०१७)** :(१) सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५-२०१६ अंतर्गत शिखर समिती मान्यता प्राप्त आराखड्यात बोटींग क्लब, कलाग्राम, स्पोर्टस क्लब, धरणाकाठी वसलेले गाव या बाबी समाविष्ट नव्हत्या. सदर आराखड्यात समाविष्ट कामे वेळेत पूर्ण करण्यात आलेली आहेत.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**यावल (जि.जळगाव) पंचायत समिती कार्यालयाची झालेली दुरवस्था**

**(२२) ७७८४० (१५-०४-२०१७). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यावल (जि.जळगाव) पंचायत समिती कार्यालयाचे बांधकाम जीर्ण होवून धोकादायक झालेले असून कर्मचा-यांच्या व नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झालेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यावल पंचायत समिती कार्यालयाचा नवीन बांधकामाचा प्रस्ताव प्रलंबित असुन बांधकामास अद्यापही मंजुरी मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कार्यालयाच्या प्रस्तावास लवकरात लवकर मंजुरी देवून काम सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०९-२०१७) :**(१) होय.
(२) हे खरे नाही. यावल पंचायत समिती नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाच्या प्रस्तावास शा.नि. दिनांक ३१.०३.२०१७ अन्वये रु. २७०.७८ लक्ष इतक्या रक्कमेची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**देवाळे (ता.करवीर, जि.कोल्हापूर) ग्रामपंचायतीमध्ये**
**एलईडी बल्बच्या खरेदीत झालेली अनियमितता**

**(२३) ७७८९४ (१९-०४-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवाळे (ता.करवीर, जि.कोल्हापूर) या ग्रामपंचायतीमध्ये १४ व्या वित्त आयोगांतर्गत हाती घेण्यात आलेल्या कामामध्ये एलईडी बल्ब बाजारात १४५० रुपये प्रतिनग किंमतीचा असलेला बल्ब ५,६०० रुपयांनी खरेदी करुन सदर कामात अनियमितता झाली असल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार एलईडी बल्ब खरेदीत अनियमितता करणाऱ्या संबधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) होय, एलईडी बल्ब खरेदीमध्ये अनियमितता आढळून आलेली आहे. सन २०१५-१६ मध्ये हाती घ्यावयाच्या कामाचा आराखडयास मान्यता घेऊन ग्रामपंचायत देवाळे यांनी रु. २,२५,०००/- रकमेचे एलईडी बल्ब खरेदीबाबतची निविदा वृत्तपत्रात प्रसिध्द करून खरेदी प्रक्रिया राबवली आहे. या खरेदीच्या प्रक्रियेत तीन निविदा धारकांनी सहभाग घेतला असून त्यापैकी न्यूनतम रकमेची (रू. ५६००/-) निविदा ग्रामपंचायत देवाळे यांनी मासिक सभा दि. १४/०३/२०१६ अन्वये मंजूर करण्यात आली. परंतू वास्तविक बाजारातील दराशी तुलना करून खरेदी करणे आवश्यक असताना ग्रामपंचायतीने बाजाराशी तुलना केलेली नाही. एलईडी बल्बच्या देखभाल दुरूस्तीसाठी रक्कम रु. १००/- च्या स्टँपवर करारपत्र करून घेतलेले नाही. गुणवत्तेबाबत तांत्रिक अधिकारी अथवा मेडा, पुणे यांचेकडून प्रमाणित करून घेतलेले नाही. बसविण्यात आलेल्या बल्बची गुणवत्ता व आकारणेत आलेला दर याबाबत कोणतीही खातरजमा न करता देयक अदा केलेले आहे. १४ व्या वित्त आयोगाचा खर्च करताना ग्रामपंचायतीने नियमानुसार व लेखासंहितेचे पालन केल्याचे दिसून येत नाही.
(३) सदर अनियमिततेस जबाबदार सरपंच यांचेविरुध्द महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम ३९ (१) अन्वये पदावरुन दूर करणेचा प्रस्ताव दि. २४/०३/२०१७ च्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडे सादर करणेत आला आहे. तसेच जबाबदार ग्रामसेवक यांना दि. २४/०३/२०१७ च्या आदेशान्वये सेवेतून निलंबित करून त्यांची खातेनिहाय चौकशी कशी प्रस्तावित करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात पंतप्रधान आवास योजनेत झालेला गैरकारभार**

**(२४) ७७९२३ (१९-०४-२०१७). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील गुंडे ग्रामपंचायतीच्या दिनांक १५ ऑगस्ट, २०१६ रोजी झालेल्या ग्रामसभेत मंजूरी दिलेल्या "पंतप्रधान आवास योजनेच्या" लाभार्थ्यांच्या यादीतील काही लाभार्थ्यांना वगळून त्यांच्या ठिकाणी आर्थिक दृष्टया सक्षम असलेल्यांना पात्र ठरवून क्षेत्रीय अधिकारी व विस्तार अधिकारी यांनी गोरगरीब लाभार्थ्यांची फसवणूक केल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणीची तक्रार ठाणे जिल्हापरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे ग्रामस्थांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करुन पात्र लाभार्थ्यांना पंतप्रधान आवास योजनेपासून वंचित ठेवून आर्थिक दृष्ट्या सक्षम असलेल्यांना पात्र करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०९-२०१७) :**(१) होय.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी केलेल्या चौकशीमध्ये क्षेत्रिय अधिकारी श्री. जयवंत मेंगाळ,केंद्रप्रमुख (शिक्षण), पंचायत समिती, शहापूर यांनी तयार केलेल्या पात्र/ अपात्र लाभार्थ्यांच्या यादीमध्ये तफावत आढळून आली असल्याने त्यांचेवर क्षेत्रिय तपासणी करताना दुर्लक्ष केल्याप्रकरणी सक्त ताकीद देऊन त्याबाबतची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रांगोळी (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील ग्रामसभेचे कार्यवृत्ताचे दप्तर गहाळ झाल्याबाबत**

**(२५) ७७९४७ (२०-०४-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रांगोळी (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील सन २०१५-१६ सालातील ग्रामसभेचे कार्यवृत्ताचे दप्तर गहाळ झाल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) होय, चौकशी करण्यात आली आहे.

ग्रामपंचायत रांगोळी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथील श्री. सुनिल काटकर, ग्रामपंचायत सदस्य यांनी सन २०१५-१६ च्या इतिवृत्ताची मागणी ग्रामविकास अधिकारी यांच्याकडे केली असता सदरचे इतिवृत्त लिपिक व शिपाई यांनी अन्यत्र ठेवल्याने ग्रा.वि. अधिकारी यांना सापडले नाही. यादरम्यान लिपिक व शिपाई मळेभागात वसुलीसाठी गेले होते. परंतू, श्री. काटकर, ग्रा. पं. सदस्य यांनी वारंवार आताच इतिवृत्त पाहिजे त्याशिवाय बाहेर जाऊ दिले जाणार नाही अन्यथा इतिवृत्त सापडत नसल्याचे लेटरहेडवर लिहून देण्याचा आग्रह धरला. या दरम्यान जमाव गोळा झाला होता. त्यामुळे निर्माण होणारा गोंधळ टाळण्याकरिता ग्रा.वि. अधिकारी यांनी इतिवृत्त सापडत नसल्याचे लेटरहेडवर लिहून दिलेले आहे.

ग्रामपंचायतीचे लिपिक व शिपाई यांनी वसूली करून आल्यावर इतिवृत्त अन्यत्र ठिकाणी ठेवल्याचे जबाबात सांगितले आहे. सदर इतिवृत्त उपलब्ध झाल्यानंतर श्री. काटकर यांना तोंडी निरोप देवून इतिवृत्त पाहण्याची विनंती केली असता ते इतिवृत्त पाहण्यास आले नाहीत.
(३) सदरचे इतिवृत्त गहाळ किंवा गायब झाले नसल्याने संबंधितांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे पिंपळगाव खांड (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथे बांधण्यात आलेल्या मध्यम प्रकल्पात पाणी साठविल्यामुळे कोतुळकडे जाणारा मुळा नदीवरील पूल पाण्याखाली गेल्याबाबत**

**(२६) ७८१९२ (१५-०४-२०१७). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे पिंपळगाव खांड (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथे बांधण्यात आलेल्या मध्यम प्रकल्पात पाणी साठविल्यामुळे कोतुळकडे जाणारा मुळा नदीवरील पूल पाण्याखाली गेल्याने माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान सदर पुलावरुन होणारी वाहतुक बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुलाची शासनाने पहाणी केली आहे काय,
(३) असल्यास, तद्नुसार सदर पुलावरुन पूर्ववत वाहतुक सुरळीत होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-०८-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.
डिसेंबर, २०१५ नंतर पाणी कमी झाल्यानंतर पूलावरुन वाहतूक चालू आहे. जानेवारी ते जून पर्यंत पूलावरुन वाहतूक चालू राहते.
(२) होय.
(३) सध्याचा पूल राज्य महामार्गावरील असून त्याची नदी तळपातळी पासून १२ मीटर उंची आहे. परंतु घळभरणीचे दुसऱ्या टप्प्यातील कामामुळे हा पूल पाण्याखाली गेला असून तेथील वाहतूक पिंपळगावखांड ते धामणगावपाट या लगतच्या पर्यायी रस्त्यावरुन वळविण्यात आली आहे.
आता सदरच्या पुलाचे सविस्तर सर्वेक्षण अन्वेषण करुन व अंदाजपत्रक तयार करुन सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावामध्ये यासाठी रु. ८०० लक्षची तरतूद केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रिसोड (जि.वाशिम) येथील वाकद भाग १ या क्षेत्रात कोराडी प्रकल्पमधून पाणी सोडणेबाबत**

**(२७) ७८२७४ (२०-०४-२०१७). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाकद भाग १ (ता.रिसोड, जि.वाशिम) येथे तयार करण्यात आलेल्या कालव्याचे काम प्रलंबित असल्यामुळे या भागातील शेतक-यांनी पाणी सोडण्यासाठी कोरडी प्रकल्प शाखा सुल्तानपुर याना प्रत्यक्ष भेटून कालवा मध्ये पाणी सोडण्याची विनंती दिनांक २० जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०९-२०१७) :** (१) होय.

दि-२३/०१/२०१७ च्या पत्रान्वये ३१ शेतकऱ्यांनी कार्यकारी अभियंता बुलडाणा पाटबंधारे विभाग, बुलडाणा यांना कोराडी भाग-२ शाखा सुलतानपूर कॅनालमधून पाणी देण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत निवेदन दिले आहे.

(२) कोराडी प्रकल्पाच्या वाकद वितरीकेच्या सा.क्र.२६०० मी. वर बागुलखेड ते गुंजखेड रस्त्याचे काम जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आले. त्या रस्त्यावर संबंधित विभागाने पुलाचे बांधकाम न केल्यामुळे वाकद भाग-१ (ता.रिसोड, जि.वाशिम) भागातील शेतकऱ्यांना कोराडी प्रकल्पाचे पाणी मिळत नाही.

सदर रस्त्याचे काम जिल्हा परिषदेमार्फत २००० साली पूर्ण झाले असून, त्या वितरीकेवर रस्त्याचे काम होण्याआधी कालव्याव्दारे रस्त्यापासून पूढे २.५ कि.मी. पर्यंत पाणी सोडण्यात येत होते. परंतु रस्त्याच्या कामामुळे वाकद वितरिकेव्दारे पुढील भागातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी पुरविणे बंद झाले असून, सदर लाभधारक सिंचनापासून वंचित राहत आहेत. कालव्यावर पूल बांधून देण्याबाबत जिल्हा परिषदेस सूचित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिन्नर (नाशिक) तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीकरिता अनुदान देण्याबाबत**

**(२८) ७८६३७ (१४-०४-२०१७). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर (नाशिक) तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे रस्त्यांची दुरवस्था झाली असून त्याचा अनेक गावांतील दळणवळणावर परिणाम झाला असल्याने अशा रस्त्यांच्या दुरुस्तीकरिता विशेष बाब म्हणून अनुदान उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.ग्रामविकास राज्यमंत्री यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांची पहाणी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, तदनुसार ग्रामीण रस्त्याच्या दुरुस्तीकरिता अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०९-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर रस्त्यांची पहाणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली आहे.
(३) अतिवृष्टीमुळे नादुरुस्त झालेल्या इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग रस्त्यांवरील वाहतूक सुरळीत सुरु राहणे आवश्यक असल्याने ३०५४ रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत अशा रस्त्यांची कामे प्राधान्याने शासन स्तरावर सादर करण्याबाबत तसेच जिल्हा नियोजन समितीकडे निधीची मागणी करण्याबाबत या विभागाकडील दिनांक २५ नोव्हेंबर, २०१६ च्या पत्रान्वये जिल्हा परिषदांना सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे किटवाड (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील दोन्ही धरणाचे व्हॉल्व्ह नादुरुस्त झाल्याने हजारो लिटर पाणी वाहून जात असल्याबाबत**

**(२९) ७८६८४ (१७-०४-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे किटवाड (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील दोन्ही धरणाचे क्रमांक १ व २ चे व्हॉल्व्ह नादुरुस्त झाल्याने हजारो लिटर पाणी वाहून जात असल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर धरणांची शासनाने पहाणी केली आहे काय,
(३) असल्यास, तदनुसार दोन्ही धरणाचे नादुरुस्त व्हॉल्व्ह दुरुस्त करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०९-२०१७) :**(१) व (२) क्षेत्रीय पाहणीनुसार दोन्ही धरणांच्या सेवाद्वारांचे रबरसील खराब झाले असून त्यामधून अल्प प्रमाणात गळती आहे.
(३) किटवाड क्र.१ व २ या धरणांची यांत्रिकी विभागाने क्षेत्रीय पाहणी करून सेवाद्वारांची आवश्यक ती दुरूस्ती केलेली आहे. त्यामुळे सदर गळती बंद झाली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजुरा (जि.गडचिरोली) तालुक्यातील भेंडाळा मध्यम सिंचन प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(३०) ७८७५० (१५-०४-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजुरा (जि.गडचिरोली) तालुक्यातील भेंडाळा मध्यम सिंचन प्रकल्पाचे काम गैरकारभारामुळे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पाचे काम प्रलंबित राहिल्यामुळे पुनर्वसनाचे देखील काम अदयापी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार भेंडाळा मध्यम सिंचन प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१९-०९-२०१७) :**(१) नाही.

प्रकल्पाचे काम भूसंपादन व पुनर्वसनाच्या अडचणीमुळे प्रलंबित आहे.

(२), (३) व (४) नाही. या प्रकल्पामुळे बाधित बेरडी (नविन) या गावाचे पुनर्वसन भेंडाळा गावालगत शासकीय क्षेत्रात करण्यात येत आहे. येथे नागरी सुविधा व भूखंड वाटप पूर्ण झाले असून बेरडी (नविन) हे गाव अतिक्रमीत जागेवर वसलेले असल्यामुळे महसूल विभागातर्फे कुठलाही मोबदला देता येणार नाही, असे स्पष्ट कळविल्यामुळे सदर गावठाणातील ८५ घरांचा सानुग्रह अनुदान प्रस्ताव तयार करण्यात येत आहे. बेरडी(जुनी) येथील घरांचे संपादनाचे प्रस्ताव भुसंपादन अधिकारी, राजूरा यांचेकडे कार्यवाही आहे. गावठाणातील प्रस्तावित शासकीय जागेवरील अभिन्यासास नगर रचनाकार, चंद्रपूर यांचे कडून मंजूरी प्राप्त असून नागरी सुविधांची व घरांचे मूल्यांकनाबाबत कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाड (जि.रायगड) तालुक्यातील कोंझर येथील काळ जलविद्युत प्रकल्पात जमीनी गेलेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(३१) ७८७६४ (१५-०४-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) तालुक्यातील कोंझर येथील काळ जलविद्युत प्रकल्पाच्या नावाखाली कोंझर येथील शेतक-यांच्या आंबा पिकांचे नुकसान झाले असून शेतक-यांच्या बनावट सहया घेऊन जमिनी घेतल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच शेतक-यांच्या झालेल्या नुकसानाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्याने प्रकल्पाला शेतक-यांनी विरोध दर्शविला असून याबाबत आंदोलनाचा इशारा शेतक-यांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) शेतक-यांच्या आंदोलनाच्या इशा-याबाबत कोणतेही थेट निवेदन प्राप्त झालेले नाही.

(३) चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) जुन्या भूसंपादन कायद्याप्रमाणे भूसंपादन प्र.क्र. ६३४ व्यपगत झाल्याने, नवीन भूसंपादन कायद्यानुसार संबंधित शेतजमीन मालकांना मोबदला मिळावा यासाठी थेट खरेदीने जमिन संपादन करणेबाबत जमिनीचे मुल्यांकन ठरविणेचा प्रस्ताव सुरवातीस दि.१३/०१/२०१६ व त्यानंतर दुरुस्तीसह जिल्हाधिकारी अलिबाग यांना दि.०७/०२/२०१७ या तारखेला प्रस्ताव फेर सादर केला आहे.

प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यानंतर थेट खरेदी करुन संबंधीत शेतकऱ्यास मोबदला देणेची कार्यवाही महसुल विभागाचे मदतीने करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील कळंब-बोरगांव रस्त्याची झालेली दूरवस्था**

**(३२) ७८८४७ (१९-०४-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील महत्वाचा कळंब-बोरगांव रस्ता वीस वर्षापासून डांबरीकरणाच्या प्रतिक्षेत असून डांबरीरणाअभावी सदर रस्त्याची दुरवस्था झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याची शासनाने पहाणी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार रस्त्यांच्या दुरुस्तीकरिता निधीची तरतूद करून रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०९-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) जिल्हा परिषदेमार्फत पहाणी करण्यात आली आहे.

(३) कळंब ते बोरगाव हा रस्ता रस्ते विकास विकास आराखडा २००१-२०२१ नुसार इतर जिल्हा मार्ग क्र.२४ असून त्याची एकूण लांबी ५.०० कि.मी. आहे. सदर रस्त्यावर खालिलप्रमाणे कामे करण्यात आलेली आहेत.

१/१०० ते १/८५० कि.मी. लांबीमधील मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम जानेवारी २०१७ मध्ये पूर्ण करण्यात आले असून रस्ता सुस्थितीत आहे.

१/८५० ते ३/०० कि.मी. लांबीतील रस्त्याचे बी.बी.एम.चे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून झालेले आहे. व कारपेटचे काम होणे बाकी आहे.

३/४०० ते ४/३०० कि.मी. लांबीतील मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम सन २०१४-१५ मध्ये झालेले असून सुस्थितीत आहे.

४/३०० ते ४/८०० कि.मी. लांबीतील मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम सन २०१५-१६ मध्ये झालेले असून सुस्थितीत आहे.

४/८०० ते ५/२०० मध्ये बोरगाव गावास बायपास रस्ता सन २०१६-१७ मध्ये भराव खडीकरणाचे काम प्रगतीत आहे.

या रस्त्याच्या साखळी क्र. ०/०० ते १/१०० व ३/०० ते ३/४०० मधील रस्ता दुरुस्तीचे काम सन २०१७-१८ ग्रामीण रस्ते विकास योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य शासनाच्या प्रत्येक विभागाचे परफॉमन्स ऑडिट घेण्याबाबत**

**(३३) ७९०४५ (१९-०४-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या प्रत्येक विभागाचे परफॉमन्स ऑडिट त्रयस्थ संस्थेकडून करुन घेण्याचा निर्णय शासनाने माहे नोंव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०८-२०१७) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही तथापि, वित्त विभागाच्या दि. १७ नोव्हेंबर, २०१६ च्या शासन निर्णयानुसार खर्चाची उत्पादकता जाणून घेण्यासाठी कामगिरीचे मोजमापन करण्यासाठीची कार्यपध्दती ठरविण्यात आली आहे.

उक्त शासन निर्णयान्वये विभागाला जो निधी उपलब्ध करुन दिला आहे, त्या निधीचा विनियोग कोणत्याप्रकारे झाला, त्याबाबतची खात्री करणे व विभागाने ठरविलेल्या निर्देशांका-प्रमाणे त्यांच्या कामाची मोजणी करणे अभिप्रेत आहे.

प्रशासकीय विभागांनी निवडलेल्या निर्देशांकानुसार झालेल्या कामांची मोजणी त्रयस्थ संस्थेमार्फत करणे अपेक्षित आहे. वित्त विभागाने कुठल्याही  त्रयस्थ संस्थेची निवड केलेली नाही.

---

**पेण (जि.रायगड) तालुक्यातील वाशी खारेपाटातील भाल रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(३४) ७९१५९ (१४-०४-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) तालुक्यातील वाशी खारेपाटातील भाल रस्त्याची दुरवस्था झाली असून येथून ये-जा करणे ग्रामस्थांसाठी गैरसोयीचे झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे अनेक वर्षापासून डांबरीकरण झालेले नाही त्यामुळे अनेकदा किरकोळ अपघाताचे प्रकारही घडलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पहाणी केली आहे काय,

(४) असल्यास, तदनुसार सदर रस्त्याच्या दुरुस्तीसह निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०९-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) जिल्हा परिषदेमार्फत पहाणी करण्यात आली आहे.

(४) पेण तालुक्यातील वाशी खारेपाटातील वढाव ते भाल हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र. ३१ असून त्याची एकूण लांबी ६.३ कि.मी. इतकी आहे. प्रत्यक्षात ४.८५ कि.मी. लांबी भाल बंदर पर्यत आहे. या लांबीपैकी ०/०० ते ३/५०० कि.मी. लांबीमधील काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत मंजूर असून निविदा स्तरावर आहे. उर्वरीत ६०० मी. लांबीच्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत मंजूर असून प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कडेगाव व शिराळा (जि.सांगली) तालुक्यातील धनीक ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीचा कर भरलेला नसल्याबाबत**

**(३५) ७९१७८ (१४-०४-२०१७). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कडेगाव व शिराळा (जि.सांगली) तालुक्यातील धनीक ग्रामस्थांनी अनेक वर्षापासून ग्रामपंचायतीचा कर भरलेला नाही तसेच अनेक गावामध्ये घरांची नोंदच नसणे किंवा कर बुडविण्यासाठी चुकीच्या नोंदी केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर वसुली न झाल्यामुळे महावितरणाकडून थकबाकीसाठी पाणी पुरवठयाचा वीज पुरवठा खंडीत करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार कर बुडविणाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०९-२०१७) :**(१) व (२) अशी बाब नाही.

सांगली जिल्ह्यातील कडेगाव व शिराळा या दोन्ही गटांची सन २०१६-१७ ची एकूण कर वसुली ही एकूण कर मागणीच्या ९०% इतकी आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पाच हजारांच्या आत लोकसंख्या असलेल्या गावांना २५-३० लाख रुपयांचा निधी देण्याच्या योजनेबाबत

**(३६) ७९१९१ (१५-०४-२०१७). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाच हजारांच्या आता लोकसंख्या असलेल्या गावांना २५-३० लाख रुपयांचा निधी देण्याची सूचना " निती " आयोगाने मान्य केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निती आयोगाच्या सूचनेनुसार शासन अंमलबजावणी करणार आहे काय व केव्हापासून करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१०-०८-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जिल्हापरिषदेच्या कोणत्याही योजनांच्या वस्तूंची रक्कम थेट लाभार्थ्यांच्या खात्यात भरण्याबाबत

**(३७) ७९३७० (१४-०४-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामविकास विभागाने माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हापरिषदेच्या कोणत्याही योजनांच्या लाभार्थ्यांना लाभ देतांना तो वस्तुरुपात असेल तर त्या वस्तूंची रक्कमच थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आह काय,

(२) असल्यास, दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार कोणत्याही साहित्याची खरेदी करु नये, त्यासाठी गरज असेल तर शासनाची परवानगी घ्यावी तसेच योजनेचा लाभ घेणा-या लाभार्थ्यांनी आधी साहित्य खरेदी करावी, त्या खरेदीची कागदपत्रे दाखविल्यानंतरच लाभार्थ्यांना खात्यात अनुदान वर्ग करण्यात येईल असे सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे चारचाकी वाहन खरेदीसाठी ३५ हजार इतकी वार्षिक उत्पन्नाची मर्यादा असलेल्या लाभार्थ्यांना कोणतीही बँक दोन लाखाचे कर्ज देण्यास तयार नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा प्रकारे अनेक योजनांमध्ये अडचणी येणार नाहीत यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०९-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

नियोजन विभाग शासन निर्णय दि. ५ डिसेंबर, २०१६ अन्वये विविध कल्याणकारी योजनांनमध्ये वस्तूस्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतर रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आला असून या शासन निर्णयातील परिशिष्ट “अ” मध्ये नमूद ४४ वस्तुंबाबतच लाभार्थ्यांना वस्तूस्वरुपातील अनुदानाऐवजी थेट अनुदान देण्यात येते.

(२) हे खरे नाही.

नियोजन विभाग शासन निर्णय दि. ५ डिसेंबर, २०१६ मधील धोरण हे शासनाचे सर्व विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था महामंडळे यांना लागू करण्यात आले आहे. त्यास अनुसरुन या विभागाकडील दि. ६ डिसेंबर, २०१६ च्या पत्रांन्वये उपरोक्त शासन निर्णयातील परिशिष्ट अ मध्ये नमूद वस्तूंव्यतिरिक्त अन्य वस्तू खरेदी करावयाच्या असतील त्या जिल्हयांनी प्रथमत: प्रत्यक्ष रोख हस्तांतरण अंतर्गत कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले होते व अशा प्रकारे ज्या जिल्हयाना कार्यवाही करणे शक्य नसेल त्या जिल्हयांनी तसा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील अजिंठा लेणी लगतची गावे मुलभूत सुविधांपासून वंचित असल्याबाबत

**(३८) ७९४५६ (१९-०४-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील अजिंठा लेणी लगतची गावे अद्याप वीज, पाणी, आरोग्य, शिक्षण इ. मुलभूत सुविधांपासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावांची पहाणी केली आहे काय व पहाणीनुसार शासनाने या गावांसाठी पर्यटनक्षेत्रांतर्गत रस्ते, वीज, पाणी, आरोग्य इ. मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) औरंगाबाद जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यातील अजिंठा लेणी लगतची अजिंठा, अनाड, पिंपळदरी, मुखपाठ व बाळापूर ही गावे आहेत.सदर गावांत वीज, पाणी, आरोग्य, शिक्षण इत्यादी मुलभूत सुविधा सर्वसाधारणपणे व्यवस्थित व अद्यावत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिल्लोड-सोयगाव (जि.औरंगाबाद) तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(३९) ७९४६५ (१४-०४-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिल्लोड-सोयगाव (जि.औरंगाबाद) तालुक्यात ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरवस्था झाली असल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या खराब रस्त्यांसाठी खास बाब म्हणून निधीची तरतूद करुन या रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०९-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) ३०५४ विशेष रस्ते दुरुस्ती अंतर्गत ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरुस्ती केली जाते.

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीमधून तालुका स्तरावर (PCI) आधारे प्राधान्यक्रम याद्या तयार करुन या प्राधान्यक्रम यादीनुसार/गुणांकनानुसार पात्र रस्ते निवडण्याचे व या आधारे रस्त्याचे दुरस्तीचे काम घेण्याबाबत शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, दि.०३ सप्टेंबर, २०१६ अन्वये मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

सन २०१६-१७ पासून मुख्यमंत्री ग्राम सडक योजना सुरु करण्यात आली असून या योजनेअंतर्गत कोअर नेटवर्क तयार करुन दरवर्षी विशिष्ट लांबी निश्चित करुन त्याप्रमाणे उपलब्ध होणाऱ्या निधीमधून ग्रामीण रस्त्यांची कामे करण्यात येतात.

जिल्हा परिषदेला विविध योजनेंतर्गत प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहुन प्राथम्यक्रमानुसार रस्त्यांची कामे प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

---

**जव्हार, वाडा, मोखाडा व विक्रमगड (जि.पालघर) तालुक्याला**
**रोजगार हमी योजनेची कामे उपलब्ध करण्याबाबत**

**(४०) ७९७३२ (१५-०४-२०१७). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार, वाडा, मोखाडा, विक्रमगड तालुक्यातील (जि.पालघर) रोजगार हमी योजनेची (मनरेगा) कामे अत्यल्प असल्याने रोजदारीसाठी तालुक्यातील १५४१६ मजूर स्थलांतरीत होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच तालुक्यातील ८० हजाराहून अधिक कुटुंबाकडे जॉबकार्ड उपलब्ध असताना ग्रामपंचायतीच्या दिरंगाईमुळे फक्त ६२५ कुटुंबानांच रोजगार मिळाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात अनेकवेळा मागणी करण्यात येऊनही संबंधित ग्रामपंचायतीकडून ठराव येत असूनही गटविकास अधिकारी, तहसिलदार व तालुका कृषी अधिकारी, वन अधिकारी व बांधकाम अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्यामुळे अनेक नागरिकांना रोजगारापासून वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले व सदरहू कामांस जाणीवपूर्वक विलंब करणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१८-०९-२०१७)** :(१) हे खरे नाही.

कामाच्या मागणीनुसार कामे उपलब्ध करुन देण्यात येत असल्याने रोजगाराअभावी मजुरांचे स्थलांतर होणार नाही यांची दक्षता घेण्यात येत आहे. जव्हार, वाडा, मोखाडा व विक्रमगड तालुक्यातील माहे जानेवारी २०१७ अखेरची शेल्फवरील कामांची संख्या, जॉबकार्ड कुटुंबांची संख्या, काम उपलब्ध करुन देण्यात आलेल्या मजुरांची संख्या, मनुष्यदिन निर्मिती तसेच कामांवरील खर्च याबाबतचा तपशील खालील तक्त्यात सादर करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | तालुका | शेल्फवरील कामांची संख्या | जॉब कार्ड धारक कुटुंबांची संख्या | काम उपलब्ध करुन देण्यात आलेल्या मजूरांची संख्या | निर्माण झालेले मनुष्य दिन | मगांराग्रा रोहयो कामांवरील एकूण खर्च (रु. लक्ष) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जव्हार | ४१६६ | २३०३४ | ३१५२३ | ४२४६३८ | ७२२.१४ |
| २ | वाडा | २२५ | २४६०७ | १३८७५ | २४९३०३ | ५६५.८७ |
| ३ | मोखाडा | २७११ | १५४५० | १७४३५ | २००९४८ | ३५०.९२ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | विक्रमगड | ९०२ | २४१२१ | २०८१७ | २५८३५० | ७४५.५७ |
| | एकूण | ८००४ | ८७२१२ | ८३६५० | ११३३२३९ | २३८४.५० |

(२) हे खरे नाही.

दि. २५.०७.२०१७ रोजीची तालुक्यातील जॉबकार्ड धारक कुटुंबांची संख्या व काम उपलब्ध करुन देण्यात आलेल्या मजूरांची संख्या याबाबतचा तपशील.

| **अ.क्र.** | **तालुका** | **शेल्फवरील कामांची संख्या** | **जॉब कार्ड धारक कुटुंबांची संख्या** | **काम उपलब्ध करुन देण्यात आलेल्या मजूरांची संख्या** | **निर्माण झालेले मनुष्य दिन** | **मगांराग्रा रोहयो कामांवरील एकूण खर्च (रु. लक्ष)** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जव्हार | ४१४७ | २३०३४ | १६३०९ | १८३८५४ | ४९३.०८ |
| २ | वाडा | १५५ | २४६०७ | ७१२९ | १२७६६४ | ४०६.७८ |
| ३ | मोखाडा | २७२० | १५४५० | ८४९८ | ७६३०८ | २९३.०१ |
| ४ | विक्रमगड | ९१५ | २४१२१ | १००२० | १९००९४ | ५६७.१३ |
| | एकूण | ७९३७ | ८७२१२ | ४१९५६ | ५७७९२० | १७६०.०० |

(३), (४) व (५) कामाच्या मागणीनुसार कामे उपलब्ध करुन देण्यात येत असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंचायत समिती, बसमत (जि. हिंगोली) येथे नविन प्रशासकीय इमारत बांधकामाचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी प्रलंबित असल्याबाबत**

**(४१) ८०३६९ (१७-०४-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत समिती, बसमत (जि.हिंगोली) येथे नविन प्रशासकीय इमारत बांधकामाचा प्रस्ताव आवश्यक कागदपत्रांसह प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत तेथील लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार नविन प्रशासकीय इमारत बांधकामाचा प्रस्ताव मंजुर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०९-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) वसमत पंचायत समिती प्रशासकीय इमारत बांधकामाचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. प्रशासकीय इमारतींच्या चालू बांधकामांना निधी देण्याचे दायित्व व चालू वर्षातील अर्थसंकल्पीय तरतूद विचारात घेवून राज्यातील नवीन पंचायत समिती बांधकामाबाबत मागणीचा प्राधान्यक्रम ठरवून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकणाची पाणी साठवणूक क्षमता वाढविण्याबाबत**

**(४२) ८०४५० (१८-०४-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या तुलनेत कोकणाची पाणी साठवणूक क्षमता ६-७ टक्के असून ती वाढल्यास कोकणाचे पाणी प्रश्न व इतर अनेक विकासाचे प्रश्न सुटतील याकरीता लहान-मोठे, मध्य आणि साखळी पद्धतीचे बंधारे बांधून पाणी अडवावे अशा सूचना महाराष्ट्र सिंचन परिषदेचे अध्यक्ष डॉ.मोरे यांनी केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन उक्त सूचनांचा विचार करून कोकणातील जल साठवणुकीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-०९-२०१७) :**(१) शासन स्तरावर पत्र प्राप्त नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील देगलूर येथील ७० लाभार्थ्यांचे घरकुलांचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(४३) ८०६९४ (१७-०४-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील देगलूर येथील ७० लाभार्थ्यांचे घरकुलांचे प्रस्ताव प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर लाभार्थ्यांच्या घरकुलांचे प्रलंबित प्रस्ताव तातडीने मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०९-२०१७) :**(१) व (२) नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खरसुंडी (जि.सांगली) ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील कोळेकर (भोसलेमळा) वस्तीला मुलभूत सुविधा देण्याबाबत**

**(४४) ८०९५६ (१४-०४-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खरसुंडी (जि.सांगली) ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील कोळेकर वस्ती (भोसलेमळा) येथील दहा कुटुंबाने वीज व पिण्याच्या पाणी योजनेपासून वीस वर्षापासून वंचित असल्याने सदरची मागणी करुन कोणतीच कार्यवाही होत नसल्यामुळे जिल्हा परिषद निवडणूकीवर बहिष्कार घालण्याचे निवेदन दिनांक ४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास आटपाडी तहसिलदार व प्रांताधिकार यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावाला वीज व पिण्याचे पाणी न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर गावाला वीज व पिण्याचे पाणी अशा मुलभूत सुविधा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०९-२०१७) :**(१) होय, दि. २९/१२/२०१६ रोजीच्या पत्रानुसार कोळेकर वस्तीतील ग्रामस्थांनी तहसिलदार आटपाडी यांना निवेदन दिलेले आहे.

(२), (३) व (४) ग्रामपंचायत खरसुंडीकडील ग्रामपाणीपुरवठा निधीतून ५५० मी. नवीन पाईपलाईन करण्यात आली आहे. तसेच वाढीव स्ट्रीटलाईटचे ७ पोल प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून (मनरेगा) करण्यात येणा-या कामांच्या ठिकाणी संपूर्ण तपशील प्रदर्शित करण्याबाबत**

**(४५) ८०९८७ (१५-०४-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून (मनरेगा) करण्यात येणा-या कामांच्या ठिकाणी संपूर्ण तपशील प्रदर्शित करण्याचे दिशानिर्देश असतानाही राज्यात तब्बल १ हजार ७४३ ठिकाणी फलकच लावलेले नसल्याची बाब लेखापरिक्षण अहवालातून निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तदनुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२५-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.

दि.१५/०९/२०११ ते दि.३१.०३.२०१७ या कालावधीत महालेखाकार-२, नागपूर यांचेकडून करण्यात आलेल्या लेखा परिक्षण अहवालात १७४३ ठिकाणी माहिती फलकच न लावण्याबाबत आक्षेप घेण्यात आलेला नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ८८३० ग्रामपंचायती मनरेगा योजनेचे काम करण्यास दिरंगाई करीत असल्याबाबत**

**(४६) ८११५७ (१९-०४-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तब्बल ८८३० ग्रामपंचायतीनी मनरेगा योजनेच्या कामांकडे दुर्लक्ष केले असून मनरेगाच्या कामांसाठी खर्च निरंक असल्याचे मनरेगाच्या अहवालातून माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच रोजगार हमी आयुक्तांलयामार्फत सर्व जिल्हयांना मनरेगा अंतर्गत ज्या ग्रामपंचायतीमध्ये एकही काम हाती घेण्यात आलेले नाही अशा ठिकाणी तातडीने एकतरी मंजूर काम हाती घेण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२५-०९-२०१७) :**(१) हे खरे आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही योजना काम मागणीवर आधारित आहे. ब-याचशा ग्राम पंचायतींमध्ये शेल्फवर कामे उपलब्ध असूनही मजूरांकडून कामाची मागणी नसल्याने अनेक ग्राम पंचायतींअंतर्गत कामे झाली नाहीत. त्यामुळे खर्च निरंक दिसून येतो. तथापि, सन २०१६-१७ मध्ये खर्च निरंक असलेल्या ग्रामपंचायतींची संख्या प्रयत्नांमुळे ८८३० वरुन ५९५० वर आली आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

नरेगा आयुक्तालयाकडून दरमहा घेण्यात येणा-या व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे तसेच लेखी स्वरुपात सुचना देण्यात आल्या आहेत. मजूरांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामांवर यावे यासाठी योजनेची प्रचार प्रसिध्दी करण्यात येते. तसेच ग्राम रोजगार दिवस, एक दिवस मजूरांसमवेत, Helpline वर कामाची मागणी नोंदविणे इ. बाबी राबवण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरूर कासार (जि.बीड) तालुक्यातील एका ग्रामपंचायतीच्या विभक्तीकरणाच्या प्रस्तावाबाबत**

**(४७) ८१४२६ (२०-०४-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरूर कासार (जि.बीड) तालुक्यातील एका ग्रामपंचायतीच्या विभक्तीकरणाच्या प्रस्तावास दिनांक ८ मार्च, २०१६ रोजीच्या स्थायी समितीच्या बैठकीत विभागीय आयुक्तांमार्फत शासनास पाठविण्यास मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावावर नियमानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०९-२०१७) :**(१) व (२) होय.

बीड जिल्हयातील शिरुर कासार तालुक्यातील हिवरसिंगा ग्रामपंचायत विभाजनाचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग यांचेकडून शासनास प्राप्त झाला आहे.

(३) हिवरसिंगा ग्रामपंचायतीचे विभाजन करुन मलकाचीवाडी हे स्वतंत्र गाव असल्याबाबतची दिनांक २ मे, २०१७ रोजी राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली अधिसूचना दिनांक ५ मे, २०१७ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधितांकडे पाठविण्यात आली आहे.

वर नमूद अधिसूचित करण्यात आलेल्या स्वतंत्र गावाकरीता महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ५ नुसार ग्रामपंचायत अस्तित्वात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील प्रादेशिक योजना असलेल्या गावांच्या गावठाणाबाहेरील क्षेत्रात बांधकाम परवानगी देण्याचे अधिकार ग्रामपंचायतींना देण्याबाबत

**(४८) ८१४३४ (२०-०४-२०१७). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अधिनियम, २०१४ (सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४३) दि.२९/१२/२०१४ अन्वये करण्यात आलेल्या सुधारणेनुसार राज्यातील प्रादेशिक योजना असलेल्या प्रदेशातील गावाच्या गावठाणाबाहेरील क्षेत्रात बांधकाम परवानगी देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकारी प्राधिकृत करतील अशा तहसीलदारापेक्षा कमी दर्जाच्या नसलेल्या अधिकाऱ्याऐवजी ग्रामपंचायतींना देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, सदरहू प्रस्तावाची तातडीने अंमलबजावणी न झाल्याने कोकणातील घरांच्या बांधणी /दुरुस्तीची कामे मोठ्या प्रमाणावर प्रलंबित राहीली असल्याने बांधकाम परवानगीचे अधिकार तातडीने पूर्ववत ग्रामपंचायतींना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०९-२०१७) :**(१), (२) व (३) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अधिनियम, २०१४ (सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४३) दिनांक २९ डिसेंबर, २०१४ अन्वये करण्यात आलेल्या सुधारणेनुसार राज्यातील प्रादेशिक योजना असलेल्या प्रदेशातील गावाच्या गावठाणाबाहेरील क्षेत्रात बांधकाम परवानगी देण्याचे अधिकार

जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकारी प्राधिकृत करतील अशा तहसिलदार या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या नसलेल्या अधिकाऱ्यांना असून यात सुधारणा करण्याची आवश्यकताबद्दल तपासणी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कारंजा व मानोरा (ता.जि.वाशिम) मधील सिंचन तलावच्या कालवा प्रणालीच्या दुरुस्तीबाबत**

**(४९) ८१५८१ (१७-०४-२०१७). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कारंजा व मानोरा (ता.जि.वाशिम) मधील ३६ सिंचन तलावाची स्थपित क्षमता ११६०१ हेक्टर असून सुद्धा कालवा प्रणाली नादुरुस्त असल्यामुळे फक्त ४९८८ हेक्टर एवढेच सिंचन होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिल्लक राहिलेल्या ६६१३ हेक्टर सिंचन क्षेत्राची पुर्नस्थापना करण्यासाठी आवश्यक २६ कोटीचा निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०९-२०१७) :**(१) अंशत : खरे आहे.
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ या कार्यालयाअंतर्गत वाशिम मंडळाकडील कारंजा व मानोरा तालुक्यातील एकुण ३१ प्रकल्पांच्या एकुण स्थापित सिंचन क्षमता १११५४ हे पैकी सन २०१६-१७ या वर्षात प्रत्यक्ष झालेले सिंचन ६५७५ हे. आहे. कालवा प्रणाली नादुरूस्त असल्यामुळे सिंचन कमी होते, ही वस्तुस्थिती आहे. यामधील बहुतांशी प्रकल्प ३० वर्ष जुने आहेत.
(२) मागील ३ वर्षात तेराव्या वित्त आयोगा मार्फत उपलब्ध झालेल्या एकूण रू. २६/- लक्ष निधी मधून १.बोरव्हा २.फूलउमरी ३.गिरोली ४.कार्ली ५.पंचाळा व ६.रतनवाडी अशा एकूण ६ लघु पाटबंधारे योजनांच्या कालवा प्रणालीच्या अंशतः दुरूस्तीची कामे करण्यात आली आहेत. जलसंपदा विभागाच्या दिनांक १७.११.२०१६ च्या शासन निर्णयानुसार, महामंडळाकडे देखभाल दुरुस्तीसाठी उपलब्ध होणाऱ्या निधीच्या मर्यादेत न बसणारी विशेष दुरुस्तीची कामे प्रचलित पध्दतीनुसार महामंडळांना उपलब्ध होणाऱ्या योजनांतर्गत निधीमधून करण्याचे नियोजित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रावेर व मुक्ताईनगर, (जि.जळगाव) तालुक्यातील पुर्नवसित गावांतील प्रशासकीय मान्यता प्राप्त नागरी सुविधा कामांसाठी उर्वरीत निधी मंजूर करण्याबाबत**

**(५०) ८३५२० (१८-०४-२०१७). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हतनुर प्रकल्प, भूसावळ (जि.जळगांव) अंतर्गत जळगांव जिल्ह्यातील रावेर, मुक्ताईनगर व भूसावळ तालुक्यातील पुर्नवसित गावांमध्ये नागरी सुविधा पुरविण्याच्या एकूण ११६ कामांच्या रकमेच्या अंदाजपत्रकास दिनांक १६ जुलै, २०१३ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रलंबित असलेली उर्वरीत कामे केव्हापर्यंत पूर्ण करण्यात येतील,

(३) असल्यास, प्रलंबित कामे तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०८-०८-२०१७) :**(१) होय.

(२) सदरची सर्व कामे प्रगती पथावर असून, त्यासाठी रुपये १०८३.२५ लक्ष एवढया निधीची मागणी जिल्हाधिकारी, जळगांव यांना क्षेत्रीय स्तरावरुन दिनांक २१/०३/२०१७ अन्वये सादर करण्यांत आली आहे. सदर निधी प्राप्त झालेवर सर्व कामे पूर्ण करण्यांत येतील.

(३) सदरची सर्व प्रशासकीय मान्यता कामे प्रगतीत आहेत, तसेच ही कामे ८० ते ९० टक्के पर्यंत पूर्ण झालेली आहेत. निधी प्राप्त होताच सर्व कामे तातडीने पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) निधी उपलब्ध नसल्याने सदरची कामे संथगतीने सुरु आहेत. निधीच्या उपलब्धतेनुसार सदरची कामे पूर्ण करण्यांत येतील.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.